खाजगी व्यवस्थापनाच्या सहा.शिक्षक, शिक्षक सेवक,सेवक इ.नियुक्त्यांना मान्यता देण्यासाठी निर्धारित कालमर्यादा.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्र.एसएसएन- २०१८/(प्र.क्र.९४/१८)/टीएनटी २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: ०४ एप्रिल २०१८.

शासन परिपत्रक

महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्थांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडून पदभरती करण्याकरता जाहिरातीसाठी परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र शिक्षणाधिकारी संस्थेने केलेल्या अर्जावर काहीही कार्यवाही करीत नाही असे आढळून आले आहे.अशाच एका प्रकरणी संस्थेने मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथे याचिका क्रमांक ६२९८/२०१६ दाखल केली.सदर याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिनांक ५.२.२०१८ रोजी अंतिम आदेश देऊन निकाली काढली आहे मा. न्यायालयाने न्याय निर्णय देतांना त्यांच्या आदेशात परिच्छेद क्रमांक ९ मध्ये खालील प्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे-

Hon'ble High Court heard the above mentioned Writ Petition No.6298/2016 on 05.02.2018 after hearing the petitioner and respondent state the matter was reserved for judgment the Hon'ble High Court observed in para No.9 of the Judgement that,

9. "While hearing various Writ Petitions, We have noticed that the Education Officers are not taking timely decisions and as a result employees are filing hundreds of petitions every year in the High Court. We direct all the Education Officers working in Secondary as well as Primary sections of the Government establishment, Zilla Parishad or on the establishment of other local bodies/Local authorities to decide,in accordance with law/procedure,the proposals Received for approvals of appointments of Assistant Teachers /Shikshan Sevaks/Class-IV employees,as expeditiously as possible, however within eight weeks from the date of receiving/receipt of such proposals.We issue note of caution to all Education Officer on any other Officers dealing with the cases of

approval to the appointments of the employees of the aforesaid categories that they should strictly adhere to aforesaid time limit, else they will have to face serious consequence of breach of aforesaid directions,however,in accourdance with law.Copy of this Judgement shall be circulated to all conern by the office of the Government Pleader and to that effect report should be submitted in the registry within two weeks from today"

२. वरील पार्श्वभूमीच्या आधारे सर्व संबधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांना या परिपत्रकाव्दारे खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

१) सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणारे शाळेतील शिक्षकांच्या नियुक्तीसाठी प्रस्ताव हे महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील तरतुदीनुसार परिपूर्ण आहेत किंवा कसे याची पूर्ण खात्री करावी.यासंदर्भात परिपत्रक क्रमांक प्राशान्या १५१४/प्र.क्र.९९/एसएम-४ दिनांक २७ मार्च २०१४ मधील सूचना विचारात घ्याव्यात.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक) जिल्हा परिषद, प्रशासन अधिकारी,नगरपालिका, शिक्षणाधिकारी,महानगरपालिका यांनी स्वत:च्या कार्यक्षेत्रातील शैक्षणिक संस्थांकडून/ विदयालयांकडून मुख्याध्यापक / शिक्षक /शिक्षण सेवक /शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या नियुक्तीस मान्यता देण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून आठ आठवडयाच्या आत त्यावर निर्णय घेऊन संबंधित संस्था/विदयालय प्रमुखांस कळवावा.सद्यस्थितीत प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर देखील आठ आठवडयांच्या आत निर्णय घेऊन संबंधितांना कळवावा.

३) मा. उच्च न्यायालय,खंडपीठ,नागपूर यांनी याचिका क्रमांक १५५४ /२०१३ मध्ये दिलेले निर्देश आणि मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांनी याचिका क्रमांक ६२९८/२०१६ मध्ये दिलेले आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४) मा न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे,संबंधित संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करुन आठ आठवडयाच्या आत संबंधित संस्था/विदयालयांना निर्णय न कळविल्यास त्याची गंभीर दखल घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.तसेच न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०४१६०३०१७७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.04.04 16:05:24 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई,
२. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
३. शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे-१,
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे,
५. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,
७. सर्व शिक्षणाधिकारी, नगरपालिका / महानगरपालिका
८. शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (दक्षिण /पश्चिम /उत्तर),
९. निवडनस्ती, (टीएनटी-२)